## जिल्हाधिकारी कार्यालय, अकोला
## रेती घाट ई-टेंडरींग व ऑक्शनकरिता संक्षिप्त अटी व शर्ती

सन 2016-17 करीता अकोला जिल्हयातील रेतीघाटांचे शासन निर्णय क्र. गौखनि 10/0512/प्र.क्र. 300/ख दि. 12 मार्च 2013 मधील तरतुदी व अटी शर्तीनुसार तसेच जिल्हा पर्यावरण विभागाच्या पुर्व अनुमतीने ई-निविदा व ई-लिलाव घेण्यात येत आहेत.

**अ)**

1. ई - निविदा व ई- लिलाव हे जिल्हा पर्यावरण विभागाचे अनुमतीनुसार घेण्यांत येत आहेत.
2. दिनांक 30 सप्टेंबर, 2017 किंवा जिल्हा पर्यावरण विभागाने पुर्व अनुमतीची अंतिम देतांना नमुद केलेली अनुमतीची अंतिम मुदत यापैकी जी अगोदर होईल तीच लिलावाची अंतिम मुदत राहील.
3. एखादया घाटास अनुकूल ठराव प्राप्त झाला नाही तर लिलावधारकास फक्त त्याने लिलावापोटी भरलेली 1/4 रक्कम परत करण्यात येईल. त्याकरिता लिलावधारकास कोणताही दावा / व्याजाची अथवा इतर भरणा केलेली शासकीय शूल्काची मागणी करता येणार नाही.
4. लिलावाची कार्यवाही करतांना लिलावाच्या बोलीच्या अनुषंगाने भरुन घेण्यात येणारी 1/4 रक्कम नेट बॅकीग,क्रेडिट कार्ड, डेबीट कार्ड, (एनईएफटी / आरटीजीएस ) पध्दतीचा अवलंब करुन ऑनलाईल (संगणकीय) पध्दतीने जिल्हाधिकारी अकोला यांच्या खात्यात जमा करावी लागेल.
5. लिलाव मंजूर झाल्यानंतर लिलावाच्या बोलीप्रमाणे 3/4 रक्कम लिलावधारकाने जमा केल्यानंतर व नियमानुसार करारनामा केल्यानंतर लिलावधारकास वाळू / रेतीघाटाचा विहीत कालावधीत ताबा देण्यात येईल.
6. सर्वोच्च ई - निविदा, ई - लिलाव धारकाने सुरक्षा ठेव, पर्यावरण शुल्क, आयकर शुल्क, सर्व्हेक्षण शुल्क, भूपृष्टभाडे, भाडेपट्टा शूल्क तसेच मोजणी नकाशा जमा केल्यानंतर करारनामा करण्यात येईल.
7. क्र. गौखनि 10/0512/प्र.क्र. 300/ख दि. 12 मार्च 2013 मधील नमूद सर्व तरतूदी आणि अटी व शर्ती निविदाधारक/लिलावधारक यांना बंधनकारक राहील.
8. लिलावधारकाने वाहतुकीदरम्यान सार्वजनिक अथवा खाजगी पाण्याच्या पाईप लाईनचे कोणतेही नुकसान होणार नाही याची दक्षता घ्यावी तद्वतच अनावधानाने कोणतेही नुकसान झाल्यास त्याची भरपाई करुन देणे बंधनकारक राहील.
9. लिलावाची मुदत संपल्यानंतर लिलावधारकाने अनुज्ञेय मर्यादेत उत्खनन केल्याबाबतचे प्रमाणपत्र सादर करावे लागेल.
10. वाळू वाहतुकीकरिता महामायनिंग प्रणालीचा वापर करण्यांत येईल.
    प्रचलित पध्दतीनुसार (अ) अकोला जिल्हा एक घटक म्हणून प्राप्त सर्वोच्च बोली (ब) तालुका एक घटक म्हणून प्राप्त सर्वोच्च बोली यांची बेरीज यापैकी जे अधिक असेल त्यास मंजूरी देण्यात येईल. जिल्हा एक घटक म्हणून बोली किंवा निविदा प्राप्त न झाल्यास उपरोक्त ब आणि त्याच तालुक्यातील रेतीस्थळांचा समूहाकरीता समुहनिहाय प्राप्त सर्वोच्च बोलींची बेरीज यापैकी जे अधिक असेल त्यास मंजूरी देण्यात येईल.

1. रेती/वाळू स्थळांच्या एकत्रित समूहाकरीता ई-निविदा स्विकारण्यात येतील. ज्या निविदाधारकांनी संकेतस्थळावर दिलेल्या ई-निविदा भरल्या नाहीत अशा निविदा धारकांच्या निविदा अवैध ठरविण्यात येतील तसेच त्याबाबत या कार्यालयात दाद मागण्याचा अधिकार राहणार नाही.

2. वाळू गटासाठी निश्चित करण्यात आलेल्या अपसेट प्राईस (हातची किंमती) पेक्षा सर्वोच्च किंमतीच्या ई-निविदाधारकांस रेती घाटांची निर्गती करण्यास नियमानुसार प्राधिकृत करण्यात येइल.

3. ई-निविदाद्वारे प्राप्त झालेले देकार हातच्या किंमतीपेक्षा जास्त नसल्यास विभागीय आयुक्तांच्या निर्देशास अनुसरुन त्या वाळू गटाच्या फेर ई-निविदा/लिलाव बोलविण्यात येईल.

4. ई-निविदेद्वारे घ्यावयाच्या रेती/वाळू स्थळात अपेक्षित वाळूसाठा आहे किंवा नाही, वाहतुकीसाठी आवश्यक रस्ते उपलब्ध आहेत किंवा नाहीत याची खात्री करुन घेण्याची जबाबदारी संबंधीत निवीदाधारकाची राहील.

5. निविदेतील प्राप्त सर्वोच्च बोलीचा देकार स्वीकारणे किंवा नाकारणे याबाबतचा अंतिम निर्णय जिल्हाधिकारी घेतील व सदर निर्णय संबंधितास निविदा उघडण्याचे दिवशीच कळविण्यात येईल.

6. सर्वोच्च ई-निविदा स्वीकारल्यानंतर व 1/4 रक्कम भरल्यानंतर 15 दिवसांत ई-निविदेतील नमूद केलेल्या उर्वरित रक्कमेचा भरणा करणे बंधनकारक आहे, अशा हमीचे दायीत्व स्वीकारणा-या दोन व्यक्तींसह निविदाधारक स्वखर्चाने खरेदी केलेल्या रुपये 100/- इतक्या रकमेच्या मुद्रांकीत (स्टॅम्प पेपर) कागदावर करारनामा करुन देईल. असे करारपत्र करुन न दिल्यास त्याने भरलेली 1/4 रक्कम जप्त करण्यात येईल व निविदा रद्द करुन संबंधीत रेती घाटाच्या फेर निविदा बोलविण्यात येतील. तसेच विहित कालावधीत वरील प्रमाणे करारपत्र न केल्याच्या परिणामी निविदाधारकास होणा-या कोणत्याही नुकसानीची जबाबदारी शासनावर राहणार नाही. निविदेमधील नमूद रकमेपैकी भरलेली रक्कम वजा जाता शिल्लक राहीलेली 75 % (3/4) रक्कम सर्वोच्च ई निविदा स्विकारल्यापासून अथवा अंतिम केल्यापासून 15 दिवसात एक रकमी भरावी लागेल. अन्यथा निविदा रद्द करण्यात येईल व 1/4 रक्कम जप्त करण्यात येईल व संबंधित रेती घाटाच्या फेर निविदा बोलविण्यात येतील. निवीदाधारकाने शिल्लक राहीलेली 75 % (3/4) रक्कम विहित मुदतीत भरल्यानंतर व नियमानुसार विहित करारनामा केल्यांनतर, त्याला वाळू स्थळाचा प्रत्यक्षात ताबा उशिरात उशिरा सात दिवसात देण्यात येईल.

7. रेती/वाळू (ठेका) ई निविदा, निविदाधारकाच्या कारणास्तव, ज्यावेळी रद्द करण्यात येईल अशा वेळेस त्या रेती/वाळू घाटाचा नव्याने जाहीरनामा काढून फेर निविदा/लिलाव बोलविण्यात येईल. फेरनिविदेत पुर्वीच्या निविदा किंमती पेक्षा कमी किंमत आल्यास फरकाची रक्कम पुर्वीच्या निविदाधारकाकडून जमीन महसुलाची थकबाकी म्हणून वसूल करण्यात येईल. तथापि फेरनिविदेत पुर्वीच्या किंमतीपेक्षा अधिक (जादा) किंमत आल्यास त्यावर पुर्वीच्या निविदाधारकास कोणताही हक्क राहणार नाही.

8. निविदाधारक, त्यांच्या ई निविदा क्षेत्रातील ज्या ठिकाणातून रेती/वाळू काढण्याने धूप होऊ शकेल व त्यामुळे निवासी इमारतींना, घरे अथवा इतर बांधकामे यांना धोका निर्माण होईल अशा ठिकाणातुन वाळूचे स्वतः उत्खनन करणार नाही अथवा इतरांना तसे करण्यास परवानगी देणार नाही. अशा प्रकरणी उत्खनन करण्यास प्रतिबंध करणारे जिल्हाधिका-यांचे निर्णय अंतिम असतील.

9. विहित केलेल्या मर्यादेच्या पलिकडे असलेल्या क्षेत्रातून रेती/वाळूचे उत्खनन करता येणार नाही. तसेच इतर व्यक्तीच्या खाजगी मालकीच्या जमिनीतून, अशा जमिनी लिलावाने देण्यात आलेल्या क्षेत्रात समाविष्ट असल्या तरी, रेती/वाळू काढता येणार नाही तसेच रस्ते/पायवाट म्हणून वापरण्यात येणा-या जमिनीतून रेती/वाळू काढता येणार नाही.

10. भूजल सर्वेक्षण विभाग/शासनाची पूर्व परवानगी घेतल्या शिवाय वाळूच्या उपस्याकरीता सक्शन पंम्पसारख्या व इतर यांत्रिक साधनांचा वापर करता येणार नाही.

11. कोणत्याही रेल्वेच्या पुलाच्या कोणत्याही बाजूने 600 मीटर्स (2000 फुट) अंतराच्या आत रेतीचे उत्खनन करता येणार नाही. तसेच जेथे नदी-नाल्यांवर पूल आहेत, त्याच्या स्तंभापासुन 100 मीटर्स पर्यंत उत्खनन करता येणार नाही. तसेच अस्तित्वात असलेल्या सार्वजनिक पाणी पुरवठा /स्त्रोतचे 500 मी. परिसरात रेती उत्खनन करता येणार नाही.

12. जेथे वाळू उत्खनन चालू आहे, त्या ठिकाणी फलक लावून उत्खनन क्षेत्राची सीमा निश्चित करुन दर्शविण्यात यावी.

13. वाळूचे/रेतीचे उत्खनन करतांना किंवा ती काढतांना खाजगी मालमत्तेस कोणातीही हानी/नुकसान पोहचल्यास त्याची भरपाई करण्याचे दायित्व निविदाधारकावर राहील. अशा हानीची/नुकसानीची परिगणना सक्षम अधिका-याकडून करण्यात येईल व त्या बाबतचा निर्णय अंतिम राहील व अशी रक्कम थकीत जमीन महसूलाच्या वसूलीप्रमाणे संबंधीत निविदाधारकाकडून वसूल करण्यात येईल.

14. ई-निविदेद्वारे दिलेल्या ठेक्याच्या कालावधीत शासनाने तो ठेका रदद केल्यास किंवा त्याला मंजूर केलेल्या क्षेत्राचे उत्खनन करण्यास किंवा रेती/वाळू काढण्यास बंदी घातल्यास निविदाधारकास शासनावर खटला भरता येणार नाही.

15. उत्खनन केलेल्या किंवा काढलेल्या वाळूचे/रेतीची साठवणुक फेर विक्रीसाठी करता येणार नाही. वाळु/रेती ठेक्याची मुदत संपण्यापूर्वीच रेती धोरण 12 मार्च, 2013 नुसार ज्या वाळूचे/रेतीचे उत्खनन केलेले आहे त्या वाळूचा/रेतीचा साठा मुदत संपन्यापूर्वीच उत्खननाच्या जागेवरुन हलविण्यात आला नाही तर तो शासनाच्या मालकीचा होईल व अशा वाळूचा/रेतीच्या किंमतीबाबत अथवा मालकीबाबत लिलावधारकास अथवा त्यांच्या ठेकेदारास कोणताही हक्क सांगता येणार नाही किंवा त्याबाबत शासनाविरुध्द दावा करता येणार नाही.

16. लिलावाने दिलेल्या क्षेत्रातील वाळूच्या रेतीच्या वाहतूकीसाठी महामायनिंग प्रणालीचा वापर करण्यांत येईल. वाळूघाटातील अनुज्ञेय साठ्याएवढे ईन्व्हाईस उपलब्ध होतील.

17. वाहतूक पावती वापराचे बाबतीत जिल्हा खनिकर्म अधिकारी यांची सही व शिक्का आवश्यक राहील. सर्व जिल्हयात याच पध्दतीने वाहतुक पावती देणे बंधनकारक राहील. लिलावाची पूर्ण रक्कम भरल्यानंतर वाळूसाठया इतके उत्खनन करण्याचा कायदेशीर अधिकार निविदाधारकास प्राप्त होईल व त्यानुसार अंदाजित वाळूसाठया इतकेच उत्खनन/वाहतूक परवाने निविदाधारकास देण्यात येईल.

18. शासनाचे निर्देशानुसार एसएमएस प्रणाली वापराचे बाबतीत येणारा खर्च तसेच पावतीचे बाबतीत बारकोडिंग किंवा तत्सम उपाय योजना करण्याचे निश्चित करण्यात आल्यास बारकोड रिडर तसेच त्याकरीता आवश्यक संगणक इतर बाबीची पूर्तता स्वखर्चाने लिलावधारकास करावी लागेल.

19. निविदाधारकाने त्याला वाटप केलेल्या/ मंजूर केलेल्या क्षेत्राच्या सीमा दर्शविणारे खांब उभारावे. तसेच लिलावधारकाचे नांव, पत्ता व जागेचा तपशिल दर्शविणारा फलक योग्य ठिकाणी लावणे आवश्यक आहे.

20. ई-निविदे द्वारे विक्री केलेल्या स्थळाचा किंवा रेती/वाळू ठेक्याचा कालावधी जास्तीत जास्त एक वर्षाचा राहील व तो सर्व साधारणतः 1 ऑक्टोबर ते 30 सप्टेंबर असा राहील. ई-निविदा घेण्याची तारीख काहीही असली तरी ई-निविदा वर्षाच्या 30 सप्टेंबर रोजीच संपुष्टात येईल. ई-निविदेद्वारे दिलेल्या क्षेत्रातून करारात नमूद केलेल्या कालावधीत, परवानगी दिलेल्या साधनाच्या सहाय्यानेच वाळूचे/रेतीचे उत्खनन करण्याची जबाबदारी निविदाधारकाची राहील. वाळू स्थळात अपेक्षित साठा

नाही, रस्ते उपलब्ध नाहीत, वाळू स्थळात पाणी आहे अशा तसेच मानीव वा नैसर्गिक आपत्तीच्या कारणास्तव सदर कालावधी कोणत्याही परिस्थितीत वाढवून दिला जाणार नाही व वाळूगट बदलुन दिला जाणार नाही.

21. उत्खनन केलेल्या वाळूच्या/रेतीच्या वाहतूकीसाठी अस्तित्वात असलेले रस्तेच निविदाधारकाने वापरावायाचे आहेत. तसेच वाहतुकीसाठी वेगळे रस्ते उपलब्ध करुन दिले जाणार नाहीत. तसेच वाहतुकीसाठी नवीन रस्ता मिळविण्याची जबाबदारी निविदाधारकाची राहील. रस्ते उपलब्ध नाहीत किंवा वाहतुकीसाठी बंद आहेत या कारणास्तव कोणत्याही परिस्थितीत रेती/वाळूम उत्खननाचा कालावधी वाढवून दिला जाणार नाही अथवा रेती/वाळू घाट बदलून दिला जाणार नाही. वापरात असलेल्या रस्त्यांची दागडुजी लिलावधारकास करावी लागेल.

22. नदीपात्रातुन/नाल्यातून अथवा त्याला रेती/वाळू उत्खनन करण्यासाठी ज्या क्षेत्राचे वाटप केले असेल त्या क्षेत्रातून रेती/वाळू उत्खनन करताना नैसर्गिक संपत्तीस व पर्यावरणास धोका होणार नाही याची सर्व खबरदारी निविदाधारकाने घ्यावयाची आहे.

23. रेतीचे/वाळूचे नदीपात्रातून/नाल्यातून शासन निर्णय दि. 25/10/2010 पासून वाळूचा किमान 6 फुट साठा शिल्लक ठेवूनच रेतीच्या प्रस्तरातून भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेच्या सर्वेक्षणानंतर विहित केलेल्या खोलीपेक्षा जास्त उत्खनन करण्यात येऊ नये. तसेच नदीपात्र/नाला यांचे पात्र बदलून अथवा त्यांस हानी पोहोचवून पर्यावरणाचे नुकसान होणार नाही याचीही खबरदारी निविदाधारकाने घ्यावयाची आहे. भूजल सर्व्हेक्षण शुल्क रु. 5000/- प्रती घाटचा डि.डि. उपसंचालक, भूजल सर्व्हेक्षण व विकास यंत्रणा, अकोला यांचे नावाने जमा करावा लागेल.

24. निविदाधारकाने गावक-यांच्या निस्तार हक्कास बाधा पोहोचविता कामा नये.

25. रेती/वाळू उत्खनन करतांना अथवा हलविताना अपघात झाल्यास निविदाधारकाने अपघाताची माहिती तात्काळ जवळच्या पोलीस ठाण्यात द्यावी. व त्याची संपूर्ण जबाबदारी वैयक्तीक निविदाधारकाची राहील.

26. निविदाधारकाने रेतीच्या/वाळूच्या वाहतुकीसाठी सक्षम प्राधिका-यांनी प्रमाणित व स्वाक्षरित केलेली वाहतुक पावती विहित नमून्यात वाळू/रेतीची वाहतुक करणा-या प्रत्येक वाहनासोबत दरवेळी देणे आवश्यक आहे. निविदाधारकाने त्याच्या ई-निविदेतील नमूद स्थळातील रेती/वाळूची वाहतूक करणा-या वाहनास त्याच्या वहन क्षमते इतक्याच परिमाणाची वाहतूक पावती द्यावी. कोणतेही वाहनांना त्यापेक्षा अधिक परिमाणाची रेती/वाळू वाहून नेत असल्याचे आढळून आल्यास त्या वाहनातील संपूर्ण गौणखनिज अवैध आहे असे समजून त्यावर नियमानुसार दंडात्मक कारवाई तसेच क्षमतेपेक्षा जास्त वाहतूकीबाबत मोटर वाहना कायद्यानुसार कारवाई करण्यात येईल. उक्त कारवाईबरोबर जप्त केलेल्या रेतीचा फेर ई-निविदा किंवा लिलाव बोलविण्यात येईल. आणि रेती घाट धारकावरही कार्यवाही करण्यात येईल. त्याचप्रमाणे निविदाधारकाने रेती. वाळूचे केलेले उत्खनन, विक्री व वाहतुक केलेल्या रेतीबाबतची दैनंदिनी हिशोब नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. ही नोंदवही व इतर हिशोब कागदपत्रे जिल्हा खनिकर्म अधिकारी, खनिकर्म निरिक्षक, महसूल अधिकारी तसेच जिल्हाधिकारी व भूविज्ञान व खनिकम्र संचालनालयातील निरिक्षण करणा-या अधिका.यांसाठी उत्खननाच्या जागेवर उपलब्ध करुन द्यावीत.

27. गौण खनिजाच्या उत्खननाचे, विक्रीचे व वाहतूकीच्या संबंधातील सर्व हिशोब व कागदपत्रे, लिलावधारकाने दिलेल्या जागेवर ठेवली पाहिजे आणि सदरहु हिशोब व कागदपत्रे संबंधित महसूल अधिकारी, खनिकर्म अधिकारी तसेच भ्विज्ञान व खनिकर्म संचालनालय, महाराष्ट्र राज्य, नागपूर

यांच्या अधिपत्याखालील अधिका-यांच्या निरिक्षणाकरिता उपलब्ध करुन द्यावीत व कार्यालयात प्रत्येक पुढचे महिन्याची 10 तारखेपर्यंत सादर करावे.

28. निविदाधारकाने करारनामा करतेवेळी ई-निविदा अटी व शर्तीचे यथोचित पालनार्थ रक्कम रु. 300000/- (रुपये तीन लक्ष फक्त) किंवा अपसेट प्राईसच्या 20 % यापैकी अधिक असेल तेवढी रक्कम अनामत रक्कम म्हणून जिल्हाधिकारी यांच्याकडे ठेवणे आवश्यक आहे. परंतू ज्या वाळू गटाची हातची किंमत रु. 10 लाखापेक्षा कमी असेल तर हातची किंमतीच्या 20% रक्कम अनामत रक्कम म्हणून घ्यावी, ही रक्कम निविदाधारकाने ई-निविदेच्या मुदतीत सर्व अटी व शर्तीचे योग्यरित्या पालन केल्यास ई-निविदेची मुदत संपल्यावर परत करण्यात येईल.

29. निविदाधारकाने नियमात नमुद केल्याप्रमाणे अटी व शर्तीचे तसेच गौण खनिज उत्खनन नियमातील तरतूदीनुसार असलेले नियम (संबंधीत विभागास लागू असलेले नियम) आणि तसेच महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियमातील तरतूदीनुसार लागू असलेल्या नियमाचे पालन करणे बंधनकारक राहील. त्याचप्रमाणे निविदाधारकाने रेतीचा/वाळूचा पूर्ण उपयोग गौण खंनिज म्हणूनच केला पाहिजे.

30. रेतीचे/वाळूचे उत्खनन करतेवेळी जर काही प्रमुख खनिज आढळून आल्यास निविदाधारकाने/ठेकेदाराने मा. विभागीय आयुक्त/मा. जिल्हाधिकारी यांच्याकडे सात दिवसात कळविले पाहिजे.

31. कोल्हापूरी पध्दतीचे बंधारे असलेल्या ठिकाणी पाटबंधारे विभाग/मा. विभागीय आयुक्त/मा. जिल्हाधिकारी यांनी निश्चित केलेल्या अंतराच्या मर्यादेचे बंधन पाळणे आवश्यक असेल. सार्वजनिक पाणवठा/पाणी पुरवठा व्यवस्था असलेल्या ठिकाणापासुन 100 मीटर अथवा भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा निश्चित करेल तेवढया अंतरापलिकडेच उत्खनन करणे बंधनकारक आहे.

32. वाळूची वाहतूक करतांना वाहनातील वाळू प्लास्टीक पेपरने/ताडपत्रीने आच्छादित करुनच वाळूची वाहतूक करणे बंधनकारक आहे.

33. मंजूर क्षेत्रातुनच मंजूर रेती साठा पेक्षा अधिक रेतीची उत्खनन व वाहतुक करता येणार नाही. मंजूर परिमाणापेक्षा अधिक वाळूसाठा रेतीगटात असल्यास त्यावर निविदाधारकास कोणताही अधिकार राहणार नाही व मंजूर परिमाणापेक्षा अधिक उत्खनन व वाहतुक केल्याचे आढळल्यास म.ज.म. 1966 च्या तरतूदीनुसार दंडास पात्र राहील.

34. अवैध वाळू/रेती साठा पकडल्यानंतर महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम 1966 मधील 48 (7) व (8) नुसार कारवाई करण्यात येईल. लिलावधारकांनी त्यांनी दिलेल्या करारनाम्यातील कुठलीही अटीचे भंग केल्यास सक्षम प्राधिकारास लिलाव रद्द करण्या व्यतिरिक्त योग्य शास्ती लादता येईल.

35. दर महिन्याचे दुस-या व चौथ्या रविवार रोजी मंजूर केलेल्या रेती घाटातून रेती उपसा करण्याचे काम बंद ठेवावे लागेल.

36. पर्यावरणाचे संतूलन राखणेसाठी निकामी वाळूचे साचलेले ढिग नदीपात्रातील वाळू उपसल्यामुळे झालेले खडडे बुजविण्यासाठी उपयोगात आणावे. त्याची जबाबदारी निविदाधारकाची राहील.

37. विक्रीकर भरण्याची जबाबदारी निविदाधारकाची राहील. तसेच आयकर व मुद्रांक शुल्क रक्कम शासन जमा करुनच करारनामा करण्याची जबाबदारी निविदाधारकाची राहील. या शिवाय जिल्हापरिषद कर/ग्रामपंचायत कर ई. विहीत केलेल्या प्रमाणे संबंधित तहसिलदारांकडे अदा करावे लागेल.

38. लिलावधारकाने त्याला वाटप केलेल्या/मंजूर केलेल्या क्षेत्राची सक्षम विभागाकडून स्वखर्चेने मोजनी करुन घेवून सिमा दर्शविणारा फलक योग्य दर्शनीय ठिकाणी लावणे आवश्यक आहे. मंजूर क्षेत्राचा ताबा निविदाधारकांनी संबंधित तहसिलदाराकडून प्राप्त करुन घ्यावी. मंजुर केलेल्या रेती घाटाचे स्वःखर्चानी तालुका निरिक्षक भूमी अभिलेखचे मोजणी व सिमांकण केलेला नकाशाचे दोन प्रती सादर करण्याची जबाबदारी निविदाधारकाची राहील.

39. रेती घाटाचा ताबा मिळल्याची प्रत सादर केल्यानंतर मंजूर केलेला रेती साठा इतक्याच प्रमाणात इन्व्हाईस/रेती वाहतुक पावत्या देण्यात येतील.

40. वाळू उत्खनन व वाहतुक वाहनाची यादी वाळू उपासा पूर्वी तहसिल कार्यालयास सादर करावी लागेल. रेती/वाळू उत्खननाची वेळ सकाळी 6.00 ते संध्याकाळी 6.00 वाजे पर्यंतच (सुर्योदय ते सुर्यास्त) राहील. त्यानंतर उत्खनन आढळल्यास अवैध समजण्यात येईल.

41. रेती लिलावाच्या रकमेच्या 2.00 टक्के आयकर (TCS) भरणा करणे बंधनकारक आहे. Under Section 206 C(IC).

42. ज्या व्यक्तीचा उच्चत्तम देकार स्विकारण्यात येईल. त्याने पर्यावरण शुल्काचा (ई-निविदेतील बोलीच्या रक्कमेच्या 2 टक्के) रक्कमेचा भरणा करावा लागेल.

43. रेती/वाळू घाटातील रेती/वाळूची वाहतूक करणा-या वाहनास त्याच्या वाहन क्षमते इतक्याच परिमाणाची वाहतूक पावती द्यावी व जिल्हाधिकारी कार्यालयास लिलावधारकाकडून सादर करण्यात येणा-या हिशेबात त्याच परिमाणाची नोंद घेण्यात यावी. याची सर्व जबाबदारी लिलावधारकाची राहील. त्यापेक्षा कमी परिमाणाची नोंद हिशोबात घेतल्याचे आढळून आल्यास लिलावधारकाविरुध्द नियमानुसार दंडात्मक कारवाई करण्यांत येईल.

44. ई-निविदांचे अटी व शर्तीमध्ये बदल करण्याचे तसेच पूर्व सूचना न देता ई-निविदा तहकुब करणे रद्द करणे तसेच ई-निविदा नामंजूर करणे इत्यादी सर्व अधिकार जिल्हाधिकारी अकोला यांनी राखून ठेवले आहेत.

45. सिलटेशन (Siltation) स्टडी बाबतचा अहवाल वाळु उत्खननापूर्वी अथवा वाळु उत्खननाचा कालावधी संपण्यापूर्वी, तज्ञ यंत्रणा जसे NIO/CWPRS कडून करुन त्याचा अहवाल पर्यावरण विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय व महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रक मंडळ यांचेकडे सादर करावा लागेल.

46. ज्या ठिकाणी कासवांची घरटी (Turtle Nesting) असेल त्या ठिकाणाहून वाळु उत्खनन करण्यास निर्बंध राहील.

47. मंजुर क्षेत्रापैकी कमीतकमी 20 टक्के क्षेत्रामध्ये नदी तिरावर तसेच गावातील वाहतुक रत्यावर झाडे लावून हरीयाली (Green Belt) करावी लागेल.

48. उत्खननाच्या वेळी Soil Erosion व Silt Manegment च्या बाबत आवश्यक त्या दक्षता घेण्यांत याव्यात.

49. उत्खननाच्या जागेवर वैद्यकीय प्राथमिक उपचार सुविधा उपलब्ध करुन दयावी लागेल.

50. उत्खननाच्या जागेवर मजुरांना जेवण बनविणे, शुध्दपाणी, वैद्यकीय उपचार व इतर आवश्यक सुविधा (कामगार कायद्यानुसार) उपलब्ध करुन द्यावी लागेल.

51. वार्षिक पर्यावरणीय अंकेक्षण अहवाल पर्यावरण विभागास सादर करावा लागेल.

52. ई-टेंडर धारकाने वाळु उत्खननाबाबतचा मासिक व सहामाही अहवाल झेरॉक्स प्रत व सि.डी./पेनड्राव्हयु मध्ये जिल्हाधिकारी कार्यालय व पर्यावरण विभागास सादर करावा लागेल.

53. अकोला जिल्ह्यात ई-निविदा प्रणालीचा वापर होत असल्यामुळे कोणतीही तांत्रीक चुक होणार नाही याची निविदाधारकाने दक्षता घ्यावी.

54. पर्यावरण विभागाने मंजूरी प्रदान करतांना घालून दिलेल्या सर्व अटी व शर्ती निविदा धारकास बंधनकारक राहतील. पर्यावरण विभागाने दिलेली पर्यावरण विषयक मंजूरी 30 सप्टेंबर, 2017 पर्यंतच असून त्यानंतर पर्यावरणावर होणा-या परिणामांची माहिती घेवून पुढील कालावधीकरीता पर्यावरण विषयक मंजूरीबाबत निर्णय घेण्यात येईल. पर्यावरण विभागाने पर्यावरण विषयक मंजूरी कोणत्याही क्षणी नाकारल्यास हा हर्रास/निविदा रद्द करण्यात येईल व रेती उत्खनन तात्काळ थांबविण्यात येईल व त्यामुळे होणा-या कोणत्याही नुकसाणीबाबत दाद मागण्याचा निविदाधारकास अधिकार राहणार नाही.

55. एसएमएस प्रणाली, बार कोड पावत्या, बारकोडींग प्रणाली करीता येणारा सर्व खर्च निविदाधाकांकडून वसूल केला जाईल.

56. लिलावधारकास नियमात नमुद केल्याप्रमाणे अटी व शर्तीचे व गौण खनिज उत्खनन नियमातील तरतुदी नुसार असलेले सर्व नियम, वाळू/रेती निर्गत संबंधित शासन निर्णय दि. 25 ऑक्टोंबर 2010 व शासन/जिल्हाधिकारी यांचे कडील वेळोवेळी निर्गत आदेश/परिपत्रक/सूचना ई. (संबंधीत विभागास लागु असलेले नियम) आणि तसेच महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियमातील तरतुदी नुसार लागु असलेल्या नियमाचे पालन करणे बंधनकारक राहील.

57. ट्रॅक्टरद्वारे रेतीची वाहतुक करावयाची झाल्यास सदर ट्रॅक्टरधारकाकडे वाणिज्यीक वाहतुकीचा परवाना असणे बंधनकारक आहे. कृषि परवाना असल्यास ट्रॅक्टरद्वारे रेतीची वाहतुक करता येणार नाही.

58. शासनास आवश्यकता भासल्यास रेती घाट किंवा त्यामधील गट नंबर रदद करण्याचे अधिकार राखुन ठेवले आहेत तसेच जिल्हाधिकारी यांचा निर्णय अंतिम राहील.

**जिल्हाधिकारी अकोला**